बैठकीमध्ये मे.ए.जी. एन्वायरो व मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. यांच्याकडील नवीन गाड्यांचे आर.टी.ओ. पासिंग चे कामकाज राहिल्यामुळे घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतूक करणे कामाची नि.नो.क्र.१०/२०१७-१८ व नि.नो.क्र.११/२०१७-१८ या निविदांचे कामकाज आम्ही दि.०१/०७/२०१९ पासून सुरु करु अशी विनंती केलेली आहे. त्याअनुषंगाने मे.राजलक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या., यांना पुन्हा १ महिना मुदतवाढ देणे आवश्यक आहे. त्यानुसार मे.राजलक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.यांची ठेकेदार म्हणून दि.०१/०६/२०१९ ते दि.३०/०६/२०१९ अखेर अथवा नवीन ठेकेदारांमार्फत कामकाज सुरु होईपर्यंत यापैकी जे प्रथम होईल त्या कालावधीपर्यंत मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या अंदाजे र.रु.र.रु.३३,५२,७३४/- (अक्षरी र.रु.तेहतीस लाख बावन्न हजार सातशे चौतीस फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेची मा.अति.आयुक्त (२) यांची मागणी असली तरी प्रस्तुत विषयातील कामासाठी र.रू.३३,५२,७३४/- (अक्षरी र.रू.तेहतीस लाख बावन्न हजार सातशे चौतीस फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४८३२ विषय क्रमांक – १८

दिनांक – १२/०६/२०१९ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.पंकज भालेकर अनुमोदक – मा.मयुर कलाटे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (२) यांचेकडील पत्र क्र.आमुका/३/कावि/३०६/२०१९, दि.२९/०५/२०१९

मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांची शिफारस विचारात घेऊन –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या “ड” क्षेत्रीय कार्यालयातील म.न.पा.चे **TATA ACE** वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहुन नेणेचे कामासाठी कामगार पुरविणे कामी देण्यात आलेल्या कामाची मुदत दि.३१/०३/२०१९ रोजी संपुष्टात आलेली आहे. सद्यास्थितीत सदर संस्थेकडे १३७ सफाई कामगार, ८ सुपरवायजर व ७७ वाहनचालक इतके कर्मचारी काम करीत आहेत. सदर कामाची मुदत दि.३१/०३/२०१९ रोजी संपुष्टात आलेली असता आरोग्यविषयक कामाकरीता असलेली आवश्यकता विचारात घेवून दि.१२/०४/२०१९ रोजीचे प्रस्तावान्वये सदर कामाचे खर्चास मा.स्थायी समितीची कार्योत्तर मान्यता घेणेकामी मा.आयुक्तसो यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर कामास २ महिने कालावधीसाठी मुदतवाढ व त्यास येणा-या खर्चाच्या मान्यतेकामी या कार्यालयामार्फत विषय पत्र क्र.आमुका/३/कावि/२९३/२०१९ दि.१६/०५/२०१९ अन्वये मा.स्थायी समितीसमोर सदरचा विषय ठेवण्यात आलेला आहे. दरम्यान मा. स्थायी समिती सभागृहामध्ये झालेल्या दि.२८/०५/२०१९ रोजीचे बैठकीमध्ये मे.ए.जी. एन्वायरो व मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. यांच्याकडील नवीन गाड्यांचे आर.टी.ओ. पासिंग चे कामकाज राहिल्यामुळे घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतूक करणे कामाची नि.नो.क्र.१०/२०१७-१८ व नि.नो.क्र.११/२०१७-१८ या निविदांचे कामकाज आम्ही दि.०१/०७/२०१९ पासून सुरु करु अशी विनंती केलेली आहे. त्याअनुषंगाने मे.सावित्री महिला

स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या., यांना पुन्हा १ महिना मुदतवाढ देणे आवश्यक आहे. त्यानुसार मे.सावित्री महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. यांची ठेकेदार म्हणून दि.०१/०६/२०१९ ते दि.३०/०६/२०१९ अखेर अथवा नवीन ठेकेदारांमार्फत कामकाज सुरु होईपर्यंत यापैकी जे प्रथम होईल त्या कालावधीपर्यंत मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या अंदाजे र.रु.४४,१२,७३५/- (अक्षरी र.रु.चौव्वेचाळीस लाख बारा हजार सातशे पस्तीस फक्त) अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेची मा.अति.आयुक्त (२) यांची मागणी असली तरी प्रस्तुत विषयातील कामासाठी र.रू.४४,१२,७३५/- (अक्षरी र.रू.चौव्वेचाळीस लाख बारा हजार सातशे पस्तीस फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४८३३ विषय क्रमांक – १९

दिनांक – १२/०६/२०१९ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.पंकज भालेकर अनुमोदक – मा.मयुर कलाटे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (२) यांचेकडील पत्र क्र.आमुका/३/कावि/३०५/२०१९, दि.२९/०५/२०१९

मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांची शिफारस विचाराच घेऊन –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या “ब” क्षेत्रीय कार्यालयांतर्गत निवडणूक(जुने) वार्ड क्रं. ४९, ५०, ५१ व ५३ तसेच "क" क्षेत्रीय कार्यालयांतर्गत निवडणूक (जुने) वार्ड क्रं. ५८, ५९ व ६० मधील म.न.पा. चे **TATA ACE** वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहुन नेणेचे कामासाठी कामगार पुरविणे कामी देण्यात आलेल्या कामाची मुदत दि.३१/०३/२०१९ रोजी संपुष्टात आलेली आहे. सद्यास्थितीत सदर संस्थेकडे १०६ सफाई कामगार, ४ सुपरवायजर व ६२ वाहनचालक इतके कर्मचारी काम करीत आहेत. सदर कामाची मुदत दि.३१/०३/२०१९ रोजी संपुष्टात आलेली असता आरोग्यविषयक कामाकरीता असलेली आवश्यकता विचारात घेवून दि.१२/०४/२०१९ रोजीचे प्रस्तावान्वये सदर कामाचे खर्चास मा.स्थायी समितीची कार्योत्तर मान्यता घेणेकामी मा.आयुक्तसो यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर कामास २ महिने कालावधीसाठी मुदतवाढ व त्यास येणा-या खर्चाच्या मान्यतेकामी या कार्यालयामार्फत विषय पत्र क्र.आमुका/३/कावि/२९१/२०१९ दि.१६/०५/२०१९ अन्वये मा.स्थायी समितीसमोर सदरचा विषय ठेवण्यात आलेला आहे. दरम्यान मा.स्थायी समिती सभागृहामध्ये झालेल्या दि.२८/०५/२०१९ रोजीचे बैठकीमध्ये मे.ए.जी. एन्वायरो व मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. यांच्याकडील नवीन गाड्यांचे आर.टी.ओ. पासिंग चे कामकाज राहिल्यामुळे घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतूक करणे कामाची नि.नो.क्र.१०/२०१७-१८ व नि.नो.क्र.११/२०१७-१८ या निविदांचे कामकाज आम्ही दि.०१/०७/२०१९ पासून सुरु करु अशी विनंती केलेली आहे. त्याअनुषंगाने मे.संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था, दापोडी, यांना पुन्हा १ महिना मुदतवाढ देणे आवश्यक आहे. त्यानुसार मे.संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था,दापोडीयांची ठेकेदार म्हणून दि.०१/०६/२०१९ ते दि.३०/०६/२०१९ अखेरअथवा नवीन ठेकेदारांमार्फत कामकाज सुरु होईपर्यंत यापैकी जे

प्रथम होईल त्या कालावधीपर्यंत मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या अंदाजे र.रु.३४,५२,२८४/- (अक्षरी र.रु.चौतीस लाख बावन्न हजार दोनशे चौ-याऐंशी फक्त) अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेची मा.अति.आयुक्त (२) यांची मागणी असली तरी प्रस्तुत विषयातील कामासाठी र.रू.३४,५२,२८४/- (अक्षरी र.रू.चौतीस लाख बावन्न हजार दोनशे चौ-याऐंशी फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४८३४ विषय क्रमांक – २०
दिनांक – १२/०६/२०१९ विभाग – स्थापत्य उद्यान
सूचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/उद्यान/१८१/२०१९, दि.३०/०५/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.94/03/2018-2019 अन्वये प्रभाग क्र.13 मधील उद्यानांची दुरुस्तीची व अनुषंगिक स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.योगिराज एंटरप्रायजेस नि.र.रू.75,51,230/- (अक्षरी र.रु.पंच्याहत्तर लाख एक्कावन्न हजार दोनशे तीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.66,04,393/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.66,04,393/- पेक्षा 23.42% कमी म्हणजेच र.रु.50,57,644/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.8,88,287/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.58,550/- = एकुण र.रु.60,04,481/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४८३५ विषय क्रमांक – २१
दिनांक – १२/०६/२०१९ विभाग – जलशुध्दीकरण केंद्र से.२३
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.संतोष लोंढे
संदर्भ – मा.सह शहर अभि.(पापु) यांचेकडील पत्र क्र.जशुके/वि/१/८३/२०१९, दि.३१/०५/२०१९

मा.सह शहर अभि.(पापु) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपा मार्फत शहरात पाणी वितरण व्यवस्थेत सुधारणा करणेकरीता अमृत योजना

राबविणेत येत आहे. सदर योजने अंतर्गत चिखली मैला शुद्धीकरण केंद्राजवळील चिखली EWS व जाधववाडी परिसरातील ठिकाणी पाणी वितरण व्यवस्थेकरीता मनपा मार्फत २० लक्ष लिटर क्षमतेची पाण्याची उंच टाकी (ESR) व संप वेल उभारण्याचे काम चालू आहे. सदर ESR भरणेकरीता ESR शेजारी संप वेल व पंप हाऊसचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सदर नव्याने उभारणेत येणा-या पंप हाऊस करीता नवीन उच्च दाब थ्री फेज विद्युत पुरवठा मिळणे करीता इकडील पत्र क्र. जशुके/वि/१/कावि/६९/१९ दि.२९/०३/२०१९ अन्वये म.रा.वि.वि.कं.यांस मागणी करणेत आलेली होती. त्यास अनुसरुन म.रा.वि.वि.कं.यांनी त्यांचेकडील सिस्टीम जनरेटेड इस्टीमेट क्र.१२२२९७३३ दि.२७.०५.१९ अन्वये त्याबाबतचे फर्म कोटेशन दिले आहे. सदर फर्म कोटेशननुसार म.रा.वि.वि.कं.यांस विषयांकित कामाकरीता अनामत रक्कम, करारनामा फी, प्रोसेसिंग फी, पर्यवेक्षण शुल्क व जीएसटी इ. असे एकूण र.रू.१७,४२,३८२/- अदा करून, सदरचे काम म.न.पा मार्फत पूर्ण करणेबाबत कळविले आहे. तथापि सदरचे काम म.रा.वि.वि.कं. यांच्या पर्यवेक्षणाखाली करणेत येणार असल्याने वरील नमूद शुल्क म.रा.वि.वि.कं. यांस अदा करणे आवश्यक आहे. सदर कोटेशन शुल्क र.रु.१७,४२,३८२/- (अक्षरी र.रु.सतरा लाख बेचाळीस हजार तीनशे ब्याऐंशी फक्त) खर्च रकमेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४८३६ विषय क्रमांक – २२

दिनांक – १२/०६/२०१९ विभाग – उद्यान

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.उद्यान/४/कावि/१६५/२०१९, दि.३०/०५/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

म.न.पा.वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.१७/२०१८-१९ मधील मनपाचे वृक्षसंवर्धन विभागासाठी सन २०१९-२० या वर्षासाठी वृक्षारोपणासाठी मोठीरोपे पुरविणे व लागवड करून १ वर्षे देखभाल करणेकामी मे.निसर्ग लॅन्डस्केप सर्हिसेस यांची निविदा र.रू.१,०८,९५,०९६/- (अक्षरी.र.रू.एक कोटी आठ लाख पंच्यानव हजार शहण्णव फक्त) या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.००% ने कमी दराची निविदा स्विकृत करणेत आली असून त्याप्रमाणे येणारा खर्च र.रू.१,०४,५९,२९२/- चे खर्चास मान्यता देणेस व त्यांचेशी करारनामा करून कामाचा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४८३७ विषय क्रमांक – २३

दिनांक – १२/०६/२०१९ विभाग – उद्यान

सूचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.उद्यान/४/कावि/१६६/२०१९, दि.३०/०५/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

म.न.पा वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.१८/२०१८-१९ मधील मनपाचे वृक्षसंवर्धन विभागासाठी मिलीटरी हद्दीतील एच.क्यु.३३० इन्फट्रि ब्रीगेड औंध कॅम्प येथे मोठी रोपे पुरविणे व लागवड करून २ वर्षे देखभाल करणेकामी मे.न्यु गार्डन गुरूज फार्म ॲन्ड नर्सरी यांची निविदा र.रू.२,४८,६८,६५०/-( अक्षरी र.रू.दोन कोटी आठ्ठेचाळीस लाख अडूसष्ठ हजार सहाशे पन्नास फक्त) या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.७५% ने कमी दराची निविदा स्विकृत करणेत आली असून त्याप्रमाणे येणारा खर्च र.रू.२,४१,८४,७६२/- चे खर्चास मान्यता देणेस व त्यांचेशी करारनामा करून कामाचा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४८३८ विषय क्रमांक – २४

दिनांक – १२/०६/२०१९ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सूचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/२०७/२०१९, दि.३१/०५/२०१९

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.84/7/2018-19 अन्वये प्रभाग क्र.२ मोशी खिरीडवस्ती बनकरवस्ती मध्ये पेव्हींग ब्लॉक व गटर्स करणेकामी मे.पी.जे.मोटवानी नि.र.रू.30,82,149/- (अक्षरी र.रु.तीस लाख ब्याऐंशी हजार एकशे एकोणपन्नास फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,74,780/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु. 29,74,780/- पेक्षा 27.68% कमी म्हणजेच र.रु.21,51,361 /- + रॉयल्टी चार्जेस र.रु. 38,869/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.68,500/- = एकुण र.रु. 22,58,730 /- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेस व त्यांचेशी करारनामा करून कामाचा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ४८३९ विषय क्रमांक – २५

दिनांक – १२/०६/२०१९ विभाग – अ क्षेत्रीय आरोग्य

सूचक – मा.संतोष लोंढे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (२) यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/आ/२/कावि/३२०/२०१९, दि.२९/०५/२०१९

मा.अति.आयुक्त (२) यांची शिफारस विचारात घेऊन –

जगदगुरू श्री.संत तुकाराम महाराज पालखी सोहळा दि.२५/०६/२०१९ रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत प्रवेश करणार असून या दिवशी पालखी विठ्ठल मंदिर आकुर्डी येथे मुक्कामी थांबणार आहे. पालखी सोहळ्यासोबत येणा-या वारक-यांसाठी म.न.पा .मार्फत विविध सेवा/सुविधा पुरविल्या जातात. यामध्ये फिरते शौचालयाची सुविधा (पोर्टेबल टॉयलेट) पुरविणेत येते. यासाठी म.न.पा .कडे उपलब्ध असलेली फिरते शौचालये कमी पडत असलेने मागिल वर्षी अ-क्षेत्रीय कार्यालय क्षेत्रात वारक-यांचे निवासांचे ठिकाणी ठेवण्यासाठी ई निविदा नोटीस क्र.३/२०१८-१९ प्रसिद्ध करुन निविदा मागविणेत आल्या होत्या. प्राप्त झालेल्या मे.सेक्युअर आयटी फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रा .लि. यांची एकमेव निविदा अंदाजपत्रकीय दर प्रतिनग २,८३२/- पेक्षा १६.५२% टक्के जास्त म्हणजेच र.रु.३,३००/-(प्रती नग दिड दिवसासाठी भाडे) हा दर स्विकारणेत येवून भाडेतत्वावर ३०० पोर्टेबल टॉयलेट (प्रत्येकी १ सिट असलेली) उपलब्ध करणेत आली होती. या वर्षी देखिल अ क्षेत्रीय कार्यालयासाठी भाडेतत्वावर ३०० पोर्टेबल टॉयलेट, फ क्षेत्रीय कार्यालयासाठी ८० व ह क्षेत्रीय कार्यालयासाठी ३० पोर्टेबल टॉयलेट (प्रत्येकी १ सिट असलेली) दिड दिवस कालावधीसाठी आवश्यक आहेत. लोकसभा निवडणूक आचारसंहितेमुळे सदर कामाची निविदा कार्यवाही शक्य झालेली नाही. तसेच या कामाचे निविदेस मिळणारा अल्प प्रतिसाद विचारात घेता मागिल वर्षीच्या मे.सेक्युअर आयटी फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रा .लि.या निविदाकार यांचेकडून त्यांच्या मागिल वर्षीच्या मंजूर निविदा दराने पोर्टेबल टॉयलेट पुरविणेचे काम करुन घेणे प्रस्तावित आहे. याकामी त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे तसेच प्रस्तुत विषयपत्रानुसार जगदगुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळा दि.२५/०६/२०१९ रोजी विठ्ठल मंदिर आकुर्डी येथे मुक्कामी थांबणार आहे. पालखी सोहळ्या सोबत येणा-या वारक-यांसाठी ४१० पोर्टेबल टॉयलेटची व्यवस्था करणेचे प्रस्तावित आहे. तथापि पालखा सोहळ्यातील वारकरी व पालखी दर्शनासाठी येणारे भाविक यांची संभाव्य संख्या विचारात घेता ४१० पोर्टेबल टॉयलेट ऐवजी ५०० पोर्टेबल टॉयलेटची व्यवस्था मे.सेक्युर आय.टी फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रा. लि. यांचे मार्फत करणेस व याकामी येणा-या एकुण र.रू.१६,५०,०००/- (अक्षरी र.रू.सोळा लाख पन्नास हजार फक्त) इतक्या खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर ५०० पोर्टेबल टॉयलेट भक्ती शक्ती उद्यान ते दापोडी व च-होली ते दिघी या भागात आवश्यक त्या ठिकाणी ठेवण्यात यावेत तसेच भक्ती शक्ती उद्यान ते दापोडी या भागातील पोर्टेबल टॉयलेट वर चढत्या क्रमाने अ.क्र.१ ते ४५० असे तात्पुरत्या स्वरूपात क्रमांक टाकावेत व च-होली ते दिघी या भागातील पोर्टेबल टॉयलेटवर अ.क्र.४५१ ते ५०० असे तात्पुरत्या स्वरूपाचे क्रमांक टाकावेत असे एकुण १ ते ५०० पोर्टेबल मोबाईल टॉयलेट बसविलेची खात्री आरोग्य विभागाने करून त्याप्रमाणे

बील अदायगीची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४८४० विषय क्रमांक – २६
दिनांक – १२/०६/२०१९ विभाग – जशुके से.क्र.२३
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.जशुके/पापु/१४०/२०१९, दि.२९/०५/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहराच्या वडमुखवाडी, चिखली, च-होली, दिघी, मोशी इ. भागासाठी पाणीपुरवठा होणेकामी नियोजित भामा आसखेड प्रकल्प राबविण्याची प्रक्रिया सुरु आहे. जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र.बि.सिं.आ/२०१८/(३९१/१८)/सिं.व्य (धो) दि.२४/१०/२०१८ व शुद्धीपत्रक शासन निर्णय क्र.बि.सिं.आ/२०१८/(३९१/१८)/सिं.व्य(धो) दि.१३/११/२०१८ अन्वये पिंपरी महानगरपालिकेस सदर प्रकल्प राबविणेकामी ६०.७९ द.ल.घ.मि. (२.१५ टीएमसी) पाणी आरक्षण मंजूर करण्यात आले आहे. याबाबत पुणे पाटबंधारे खात्याकडून सिंचन पुनर्स्थापना खर्च भरणेबाबत व करारनामा करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. सदर विषयांस अनुसरुन मा.उप कार्यकारी अभियंता पुणे पाटबंधारे विभाग यांनी सिंचन पुनर्स्थापना खर्च भरणेबाबत दि.३०/०३/२०१९ चे पत्रान्वये मागणी केलेली आहे. याबाबत मा.विभागीय आयुक्त पुणे यांचेसमवेत भामा आसखेड प्रकल्पाची पुनर्वसन संबंधात वेळोवेळी बैठका आयोजीत करण्यात आल्या आहेत. दि.२५/०१/२०१७ रोजी सदर बैठकीस भामा आसखेड प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनासाठी द्यावयाचे प्रती कुटुंब र.रु.१०.०० लाख प्रमाणे १३०३ खातेदारास एकूण र.रु.१३१ कोटी या विशेष पॅकेजेमधील आर्थिक सहभाग उचलणेबाबत चर्चा झाली. त्यावेळेस मा.आयुक्त पुणे महापालिका यांनी खालील प्रमाणे प्रस्ताव मांडला आहे. “सिंचन पुनर्स्थापना खर्च हा पाटबंधारे विभागाने सोडून दिल्यास विशेष पॅकेजच्या र.रु.१३१ कोटी मधील पिंपरी चिंचवड महापालिकेचा हिस्सा देण्यास मा.मुख्य सभेसमोर प्रस्ताव ठेवण्यात येईल व मा.महापालिका सभेने घेतलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.” यानंतरचे काळात प्रकल्पग्रस्त शेतकरी यांचे समवेत मा.जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे दि.२६/१२/२०१८ रोजी बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीमध्ये मा.जिल्हाधिकारी यांनी प्रकल्पग्रस्त शेतकरी यांना र.रु.१० लाख प्रती हेक्टर प्रमाणे पुनर्वसनापोटी रक्कम देण्याचा प्रस्ताव दिला. तथापि प्रकल्पग्रस्त शेतक-यांना र.रु.२५ लाख प्रती हेक्टर दराने पुनर्वसनापोटी मागणी केली. यावर प्रकल्पग्रस्त शेतक-यांचे प्रतिनिधी व मा.उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन) यांनी मध्यम मार्ग काढणे बाबत चर्चा करावी असे ठरले. त्याप्रमाणे सुमारे ४०० प्रकल्पग्रस्त शेतक-यांनी र.रु.१५ लाख प्रती हेक्टर दराने रक्कम स्विकारण्यास तयार असल्याचे समंती पत्र दिले असल्याचे मा.उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन) यांनी सांगितले आहे. तथापि सदर पुणे महानगरपालिकेचे काम ही भामा आसखेड प्रकल्पग्रस्त शेतक-यांनी जागेच्या बदल्यात जागा मिळावी व

काही शेतक-यांनी पुनर्वसनापोटी र.रु.२५ लाख प्रती हेक्टर दराने रक्कम मिळावी यासाठी दि.०७/०३/२०१९ रोजी प्रत्यक्ष कामाच्या जागेवर आंदोलन करुन जॅकवेल व पाईप लाईनचे काम बंद पाडले आहे. याबाबत मा.मुख्य मंत्री महाराष्ट्र राज्य यांचे समवेत दि.०८/०३/२०१९ रोजी मुंबई येथे झालेल्या बैठकीत पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी सिंचन पुनर्स्थापना खर्चापोटी भरावयाची रक्कम माफ करणेस व त्याऐवजी र.रु.१५ लाख प्रती हेक्टर दराने सदर पुनर्वसन खर्चापोटी प्रकल्पग्रस्त शेतक-यांस अदा करणेस निर्णय झाल्याचे समजते. सदर र.रु.१५ लाख प्रती हेक्टर दराने पुनर्वसन खर्चापोटी प्रकल्पग्रस्त शेतक-यांस आदा करणेची कार्यवाही करण्यास खालील बाबींची पुतर्ता होणे आवश्यक आहे असे विभागाचे मत आहे. तथापि मा. मुख्य मंत्री यांनी दि.०८/०३/२०१९ रोजी सदर सिंचन पुनर्स्थापना खर्च पुणे व पिंपरी चिंचवड महानगपालिकेस माफ केल्याचे व सदर रक्कम पुनर्वसन खर्चापोटी वळती करणेबाबतचे पत्र शासनाकडून प्राप्त होणे गरजेचे आहे. सदर पुनर्स्थापना खर्चापोटी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१९-२० च्या अंदाज पत्रकात खालील प्रमाणे तरतूद उपलब्ध आहे. सन २०१९-२० पाणीपुरवठा विशेष योजना निधी या लेखाशिर्षाअंतगर्त अंदाजपत्रक १ मधील अ.क्र.१ पान क्र. २६१ वर "पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी पाण्याचा अतिरिक्त स्त्रोत निश्चित करणे. त्यातील पाणीसाठा आरक्षित करणे व तदनुषंगिक कामे करणे." या कामा अंतर्गत र.रु.३७.५० कोटी तरतूद करण्यात आली असून यामधून पाणी आरक्षणापोटी पाटबंधारे विभागाकडे सिंचन पुनर्स्थापना खर्चापोटी / पुनर्वसनाची रक्कम आदा करणे शक्य आहे. एकूण प्रकल्पग्रस्त शेतक-यांची संख्या सद्यस्थितीत १३०३ आहे. तथापि यापूर्वी मा. जिल्हाधिकारी कार्यालयात वेळोवेळी झालेल्या चर्चेनुसार सदर संख्या वाढण्याची शक्यता आहे. यामधील ३८८ शेतक-यांनी मे.हायकोर्ट मुंबई यांचे निर्णयाप्रमाणे जमिनीच्या बदल्यात जमिन देणेची मागणी केली आहे. सदर मागणीची पुर्तता मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून होणे अपेक्षीत आहे. तसेच सुमारे ४०० शेतक-यांनी र.रु.१५.० लाख प्रतिहेक्टर रोख रक्कम मिळणेबाबत संमती दर्शविली आहे. तसेच उर्वरित काही शेतकरी र.रु.२५.० लाख प्रतिहेक्टर रोख रक्कम मिळणेबाबत मागणी करीत आहेत. सदर मागण्या वेगवेगळ्या स्वरुपाच्या असल्याने सर्व प्रकल्पग्रस्त खातेदारास द्यावयाच्या नुकसान भरपाई बाबत एकत्रित निर्णय शासनाकडून प्राप्त होणे गरजेचे आहे. यापुढे काम सुरु केल्यानंतर विना अडथळा सलगपणे पुर्ण करणेसाठी सर्व प्रकल्पग्रस्त शेतक-यांची संमती आवश्यक आहे. तदनंतर काम पूर्ण करणेबाबत नियोजन करणे शक्य होईल असे विभागाचे मत आहे सबब सर्व प्रकल्पग्रस्त शेतक-यांच्या मागण्यांबाबत ठोस निर्णय मे.शासनाकडून मिळणे अपेक्षित आहे. मा.महापालिका सभा ठ.क्र.३०६ दिनांक ३१/१०/२०१८ अन्वये मंजूर झालेल्या सिंचन पुनर्स्थापना खर्चापोटी द्यावयाच्या रकमेस मान्यता आहे. पाणी आरक्षणापोटी सदर खर्च होणार असल्याने प्रकल्पग्रस्त शेतक-यांस पुनर्वसनापोटी रक्कम अदा करणेबाबत मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. या व्यतिरिक्त जलसंपदा विभागाकडून धरण बांधकाम व कालवे बांधकामाचा प्रतीपूर्ती खर्च पुणे व पिंपरी चिंचवड मनपाने पाणी आरक्षणाचे प्रमाणात भरणेस तयार असल्याबाबत बंधपत्र देण्याची मागणी करण्यात आली आहे. सदर प्रतीपुर्ती खर्च पिंपरी चिंचवड महानगपालिकेकडून जलसंपदा विभागास देणे अडचणीचे आहे याबाबतही निर्णय घेणे आवश्यक आहे. तरी दि.०८/०३/२०१९ रोजी मंत्रालयास मुंबई येथ झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने पाणी आरक्षणापोटी भरावयाची सिंचन पुनर्स्थापना खर्ची पोटी द्यावयाची रक्कम प्रकल्पग्रस्त शेतक-यांच्या

पुनर्वसन नुकसान भरपाईपोटी अदा करण्याचा निर्णय झाल्याचे समजते. सदर निर्णयाची प्रत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस प्राप्त होईल या भरवश्यावर सदर निर्णयाच्या अनुषंगाने मा.महापालिका सभा ठ.क्र.३०६ दि.३१/१०/२०१८ अन्वये मंजूर झालेल्या सिंचन पुनर्स्थापना खर्चापोटी द्यावयाची रक्कम मे.शासनाने माफ केल्यास पिंपरी चिंचवड महनगरपालिकेच्या हिश्याची रक्कम प्रकल्पग्रस्त शेतक-यांस पुनर्वसनापोटी मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अदा करणेबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणी भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेअंतर्गत पाटबंधारे विभागाकडे सिंचन पुनर्स्थापना खर्च भरणेऐवजी प्रकल्पग्रस्त शेतक-यांस पुनर्वसनापोटी मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे रक्कम वर्ग करणेकरीता

१. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडील दि.०७/०५/२०१९ च्या (र.रु.५ कोटी) भरण्याच्या मान्य प्रस्तावाचे धरतीवर भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेअंतर्गत मा.जिल्हाधिकारी पुणे यांच्या मागणीनुसार भामा आसखेड प्रकल्पातील प्रकल्पग्रस्त खातेदारांना रोख रक्कमेच्या स्वरुपात पुनर्वसनाची रक्कम भरपाई पोटी तुर्तास र.रु.४.१७५ कोटी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

२. सदर पुनर्वसन खर्चापोटी प्रकल्पग्रस्त शेतक-यास अदा करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकातील सन २०१९-२० पाणीपुरवठा विशेष योजना निधी अंदाजपत्रक १ मधील अ.क्र.१ पान क्र.२६१ वर "पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी पाण्याचा अतिरिक्त स्त्रोत निश्चित करणे त्यातील पाणीसाठी आरक्षित करणे व तदनुषंगिक काम करणे " या लेखाशिर्षाअंतर्गत र.रु.३७.५० कोटी तरतूदीमधून र.रु.४.१७५ कोटी पाणी आरक्षणापोटी पाटबंधारे विभागाकडे सिंचन पुनर्स्थापना / पुनर्वसन रक्कम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८४१ | विषय क्रमांक – २७
दिनांक – १२/०६/२०१९ | विभाग – औ.प्र.संस्था, मोरवाडी
सूचक – मा.संतोष लोंढे | अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.औप्रकें/४/कावि/५५०/२०१९, दि.२७/०५/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी येथे प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देणेकरिता मा.अति. आयुक्तसो. यांचेकडील आदेश क्र.औप्रसं/४/कावि/४९/२०१९ दि.१०/०१/२०१९ अन्वये प्रस्तावात नमुद कर्मचा-यांना दि.०५/१२/२०१८ ते दि.०४/०६/२०१९ या सहा महिने कालावधीसाठी एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित र.रू.२५,०००/- (अक्षरी र.रू.पंचवीस हजार फक्त)

नेमणूक देण्यात आलेली आहे. सदर नेमणूकीचा कालावधी दि.०४/०६/२०१९ रोजी संपुष्टात येत आहे. प्रस्तावात नमूद केलेल्या अ.क्र.०१ ते ०९ कर्मचा-यांनी नियमित वेतन श्रेणीत नेमणूक मिळणेकामी मे.उच्च न्यायालय येथे म.न.पा. विरूध्द दाखल याचिका क्र.२५६६/२००५ दाव्यानुसार मे.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार मुदतवाढ देणे आवश्यक आहे. प्रस्तावात नमुद अनु.क्र.०१ ते ०९ कर्मचा-यांना मे.उच्च न्यायालय येथे म.न.पा. विरूध्द दाखल याचिका क्र.२५६६/२००५ दाव्यानुसार मे.उच्च न्यायालयाचे यांच्या आदेशास अधीन राहून व मा.कायदा सल्लागार यांच्या अभिप्रायानुसार दि.०५/०६/२०१९ रोजी रमजान ईद निमित्त सुट्टी असल्याने दि.०६/०६/२०१९ रोजी एक दिवस सेवाखंड देवून दि.०७/०६/२०१९ ते दि.०६/१२/२०१९ पर्यंत सहा महिने कालावधीकरीता हंगामी नियुक्ती देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८४२ | विषय क्रमांक – २८

दिनांक – १२/०६/२०१९ | विभाग – स्थापत्य अ मुख्यालय

सूचक – मा.करूणा चिंचवडे | अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/अ-मुख्य/२२८/२०१९, दि.३१/०५/२०१९

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.81/4/2018-19 अन्वये प्रभाग क्र.१० मधील मोरवाडी आय.टी.आय. येथे स्थापत्य व फर्निचर विषयक कामे करणेकामी मे.अक्षय भारत बजबळकर नि.र.रू.58,11,464/- (अक्षरी र.रु.अठ्ठावन्न लाख अकरा हजार चारशे चौसष्ठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.57,94,911/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.57,94,911/- पेक्षा 21.21% कमी म्हणजेच र.रु.45,65,810/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.402/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.16,150/- = एकुण र.रु.45,82,362/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

**(मडिगेरी विलास हनुमंतराव)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/५९४/२०१९
दिनांक – १२/०६/२०१९

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(क्र.स्था/श.अं./तां/१/१८६/२०१९, दि.३०/०५/२०१९ विषय क्र.१५ चे लगत)

PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION

EMPANELMENT OF PROJECT MANAGEMENT CONSULTANTS

**Road & Storm water Drainage Projects, General civil engineering works (ANNEXURE-'A)'**

| Sr.no | Name of Consultant | Details of Experience | Name of Firm / Personal | Phone No | Pan and Adhar no | E-mail | Adress | Year of Registration | Work Experience | Annual Turn Over | Employee Details | Eligible or Not-Eligibal (For Which Category) | Reason |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **CATEGORY-I (UP to 5 Cr.)** | | | | | | | | | | | | | |
| 1 | RUDRAKSH INFRA CONSULTANS | **Roads** | RUDRAKSH INFRA CONSULTANS | 9767894006 | AIKPR7077C | rudraakshainfra@gmail.com | #5, Gajanan Apartments, PC Link Road, Tanaji Nagar, Chinchwad, Pune - 411033 | ....... | As per EOI | As per EOI | As per EOI | **Eligible for A-I** | As per Seprate Sheet Attatched |

**Add.Commissioner-1**
**PCMC, Pimpri-18**